# मुंबईतील मेट्रो तीनची स्थानके असणार पूरमुक्त

## पाण्याचा निचरा होण्यासाठी व्यवस्था

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईतील पहिली भूमिगत मेट्रो-३ कुलाबा ते सिप्झपर्यंत धावणार असून या मेट्रोची स्थानके पूरमुक्त असणार आहेत. अर्थात अतिवृष्टी झाली तरी सेवेवर कोणताही परिणाम होणार नाही. भूमिगत मेट्रोची स्थानके जमिनीच्या १.५ मीटर खाली बांधण्यात आली आहेत आणि पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठीही व्यवस्था करण्यात आली आहे. एमएमआरसीने मेट्रो-३च्या भूमिगत स्थानकात पावसाचे पाणी साचलेच तर त्याचा निचरा करण्यासाठी उपसा पंपही बसवले आहेत.

मेट्रोच्या भूमिगत स्थानकांत केवळ स्थानकांच्या एन्ट्री आणि एक्झिट पॉइंट येथूनच पाणी शिरण्याची शक्यता आहे. त्यानुसार पाण्याची अडवणूक करण्यासाठीही येथे व्यवस्था करण्यात आली आहे. अतिवृष्टी झाली आणि मुंबईत पूरस्थिती निर्माण झाली तरीही येथील फ्लूडगेट्स हे पाणी अडवण्यासाठी सक्षम आहेत. अशाच प्रकारे याचे बांधकाम करण्यात आल्याचे एमएमआरसीतर्फे सांगण्यात आले.

### १ हजार किमी चाचणी पूर्ण

सध्या मेट्रो-३च्या आरे ते मरोळ नाकापर्यंत सुमारे १ हजार किमी चाचणी पूर्ण झाली आहे आणि फेब्रुवारीपर्यंत ही चाचणी प्रक्रिया पूर्ण करण्याचे एमएमआरसीचे नियोजन आहे. सध्या प्रतितास ६५ किमी वेगाने चाचणी सुरू आहे. हा वेग पुढे ९५ किमी प्रतितासपर्यंत नेण्यात येणार आहे. त्यानंतर सिग्नल व्यवस्थेसंबंधी चाचणी घेण्यात येईल, असे एमएमआरसीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.



### ...त्यानंतर सहारपर्यंत चाचणी घेणार

आरे आणि मरोळ नाका स्थानकांदरम्यानच्या तीन किलोमीटर लांबीच्या एका ट्रॅकवर ३० ऑगस्टपासून चाचणी सुरू आहे. पहिला प्रोटोटाइप रेक या ट्रॅकवर रात्री नियमितपणे धावत आहे. क्रॉसओव्हर ट्रॅक काढून टाकल्यानंतर ही चाचणी सहारपर्यंत करण्यात येणार आहे. मेट्रो तीनसाठीची प्रोटोटाइप कोच सुमारे ३,२०० मिमी रुंद असून, २,४०० प्रवासी क्षमता आहे.